## १० व्या पंचवार्षिक योजनेसाठी

# दारिद्र्य रेषा गणना-२००२ पासून सुरु...

# २००३ ... २००५ ... २०?? ...

---

**प्रस्तावना**

**दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकास मंत्रालयाने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना सन २००२ साली हाती घेतली होती. दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजनांसाठी 'लाभार्थी' म्हणजेच गरीब कुटुंबे निश्चित करणे हे या गणनेचे उद्दिष्ट होते. गणनेची प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरु झाल्यानंतर मध्यंतरीच्या काळामध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. महाराष्ट्रामध्ये २००३ साली या गणनेचे काम प्रत्यक्षामध्ये सुरु झालेले असले तरीही अद्यापपावेतो दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या याद्यांना प्रशासनास अंतिम स्वरूप देता आलेले नाही. वास्तविक पहाता दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२००२ ते २००७) विविध योजनांचे लाभार्थी या यादीच्या साहाय्याने निश्चित होणे अपेक्षित होते. आता दहाव्या पंचवार्षिक योजनेची चार वर्षे उलटून गेली आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना विविध योजनांचे लाभ मिळणे तर दूरच, परंतु ११ व्या पंचवार्षिक योजनेसाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणनेची प्रक्रिया जवळ येऊन ठेपली आहे. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेऊन यातील प्रमुख प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधणे आणि योग्य कारवाईसाठी उपाय सुचवणे हे या टिपणाचे उद्दिष्ट आहे.**

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणनेच्या देशपातळीवरील प्रक्रियेचे साक्षेपाने विश्लेषण केल्यास यामधील 'दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे ठरवण्यासाठी निश्चित केलेले निकष/निर्देशक' आणि  सर्वेक्षणासाठी निश्चित केलेली व प्रत्यक्षात घडलेली प्रक्रिया' अशा दोन्ही स्तरांवरती अनेक विसंगती असल्याचे लक्षात आले आहे. यापैकी निकषांच्या पातळीवरील त्रुटींची चर्चा या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उपस्थित करणे सुसंगत ठरणार नसल्याने त्याबाबतची माहिती 'परिशिष्ट:१' च्या स्वरूपामध्ये सदर टिपणास जोडली आहे. **परंतु महाराष्ट्रामध्ये गेल्या चार वर्षांमध्ये झालेली प्रक्रिया आणि त्यासाठी खर्चण्यात आलेला वेळ व पैसा याचे महत्त्व लक्षात घेऊन 'प्रक्रियेच्या' स्तरावरील महत्त्वाचे मुद्दे येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.**

## सर्वेक्षणाची प्रक्रिया अपेक्षित आणि प्रत्यक्षात

शासनाने तयार केलेल्या मार्गदर्शक डॉक्युमेंट्समधे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणनेची प्रक्रिया कशी करायची, याचे तपशीलवार विवेचन आहे. प्रत्यक्षात मात्र अपेक्षित आणि वास्तव यात बरीच तफावत आहे. खालील मुद्यांच्या आधारे ती स्पष्ट केलेली आहे –

- **प्रगणकांची निवड**

**अपेक्षित :** तलाठी, शिक्षक आणि आरोग्यखात्याच्या कर्मचाऱ्यांनी प्रगणक म्हणून काम करावे.

**प्रत्यक्षात :** आरोग्यखात्याच्या मंत्र्यांनी 'आरोग्यखात्याचे कर्मचारी हा 'अतिरिक्त भार' पेलू शकणार नाहीत असे जाहीर केले. आरोग्यखात्याच्या कर्मचाऱ्यांनी प्रगणकाचे काम करायला नकार दिला म्हणून तलाठी व शिक्षक यांनीही या कामाला नकार दिला. परिणामी सुशिक्षित/अर्धशिक्षित बेरोजगारांची प्रगणक म्हणून निवड करण्यात आली.

सर्वेक्षणासाठी वेतन अत्यल्प – एका कुटुंबामागे केवळ रु. तीन असल्यामुळेही या निवडीवर मर्यादा आली. गुणवत्तेचा विचार न करता मिळतील ते प्रगणक नेमावे लागले.

- **सर्वेक्षणाची तयारी – प्रगणक व गावपातळीवरील प्रशिक्षण**

**अपेक्षित :** सर्वेक्षण होण्यापूर्वी गावपातळीवर सरपंच व उपसरपंच यांचे संपूर्ण प्रक्रियेबाबत प्रशिक्षण होणे अपेक्षित होते. या प्रशिक्षणाच्या आधारे सरपंचांनी तसेच ग्रामसेवक व इतर पंचायत सदस्यांनी प्रगणकांना तसेच गावकऱ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन व मदत करायची होती.

प्रगणकांचेही सर्वेक्षण – प्रक्रियेबाबत व गणना – पत्रके भरण्याबाबत सर्वेक्षणापूर्वीच प्रशिक्षण व्हायला हवे होते.

**प्रत्यक्षात :** या दोन्ही गटांना प्रशिक्षण अजिबातच दिले गेले नाही, किंवा अतिशय जुजबी माहिती देण्यात आली. केवळ औपचारिकता म्हणून दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामुळे काही ठिकाणी तर सर्वेक्षण झाले आहे अथवा नाही याबाबतही गावकऱ्यांमधे एकमत नव्हते. यावरूनच प्रशिक्षणाच्या दर्जाची कल्पना करता यावी.

- **प्रगणकांनी करावयाची पूर्वतयारी**

**अपेक्षित :** गणना–पत्रके भरायला सुरुवात करण्यापूर्वी प्रगणकांनी त्या–त्या गावाला भेट देऊन गावाचा (गाव मोठे असल्यास प्रगणक गटाचा – एका प्रगणक गटात २०० कुटुंबे असावीत.) कल्पनादर्शक नकाशा तयार करायचा आहे. कोणतेही घर/कुटुंब वगळले जाऊ नये यासाठी गावातील सर्व इमारतीची व घरांची पहाणी करून घर – यादी – पत्रकात नोंद करायची आहे.

**प्रत्यक्षात :** प्रगणकांनी यापैकी कोणत्याही प्रकारची पूर्वतयारी केलेली नाही. वेळेअभावी (कमीत–कमी वेळात जास्तीत जास्त काम करण्याच्या दडपणापोटी) एकाच भेटीत मिळेल तेवढी माहिती गोळा करण्यात आलेली आहे. गावातील सर्व कुटुंबांचे सर्वेक्षण तर सोडाच पण ज्यांचे सर्वेक्षण होणे अतिशय आवश्यक आहे अतिशय गरीब कुटुंबांचा समावेशही सर्वेक्षणात झालेला नाही.

- **प्रत्यक्ष सर्वेक्षण – (गणना–पत्रके भरण्याची पद्धत)**

**अपेक्षित :** प्रगणकाने प्रत्येक कुटुंबातील जबाबदार व्यक्तीशी बोलून, प्रत्येक कुटुंबाला भेट देऊन गणना– पत्रके भरायची आहेत. स्थलांतरित नसलेल्या, तात्पुरत्या बंद असलेल्या घरांची माहिती पुनः पुन्हा भेटी देऊन माहिती घ्यावी. सर्वेक्षणाच्या अंतिम तारखेपर्यंत अशी कुटुंबे न भेटल्यास किंवा त्यांनी माहिती न दिल्यास शेजाऱ्यांकडून तसेच काम पंचायतीकडून माहिती घ्यावी. गणना पत्रक भरताना

**प्रक्रियेमध्ये सहभागी घटकांच्या भूमिका**

ग्रामपंचायत:
- सर्वेक्षणाची माहिती सर्व गावकऱ्यांपर्यंत पोचवणे, व प्रगणकांना सर्व गावकऱ्यांपर्यंत पोचायला मदत करणे.
- कच्च्या यादीच्या चर्चेसाठी ग्रामसभा भरवणे व अतिशय गरीब कुटुंबे त्याला उपस्थित रहातील असे बघणे.
- ग्रामसभेअंतर्गत – कच्च्या यादीतील त्रुटी अथवा चुका प्रगणकांच्या निदर्शनास आणणे आणि आवश्यक त्या प्रकरणी फेरतपासणी / फेरसर्वेणिची मागणी करणे.
- कच्च्या यादीबाबत गावकऱ्यांच्या तक्रारी गट–विकास–अधिकाऱ्याकडे तक्रार अर्ज करून पोचवणे.

गटविकास अधिकारी:
- ग्रामपंचायतीने केलेल्या तक्रार अर्जाची दखल घेऊन पुर्नतपासणीचे आदेश देणे व आवश्यक तेथे मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता तपासणे.
- गावस्तरावर तयार झालेल्या कच्च्या याद्या जिल्हा–स्तरावर निश्चितीसाठी पाठवणे (ग्रामसभेची मजुरी घेऊन)

जिल्हास्तर
(जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा)
- संपूर्ण प्रक्रियेचे समन्वयन करणे.
- तालुका स्तरावरून आलेल्या कच्च्या याद्यांची निश्चिती करणे.

राज्यस्तर(आमदार):
- दारिद्र्यरेषा–निश्चितीनंतरजिल्हा स्तरावरून आलेल्या याद्या निकषांनुसार व ठरलेल्या निर्देशांकानुसार आहेत ना हे तपासणे.
- दारिद्र्यरेषा–गुणांकानुसार पक्क्या याद्या तयार करून त्या जाहीर करणे.

गुणांकन पेननेच करायचे आहे. संबधित कुटुंबाला त्या गुणांची कल्पना देऊन मगच गणना–पत्रकावर माहिती देणाऱ्या व्यक्तीची सही/अंगठा घ्यायचा आहे.

**प्रत्यक्षात :** प्रगणकांनी कुटुंबांना प्रत्यक्ष न भेटताच सरपंच वा इतरांच्या मदतीनं माहिती भरण्याचा प्रयत्न केलेला आहे. बंद असलेल्या घरासाठी पुनः पुनः भेटी कोठेही दिल्या गेलेल्या नाहीत. काही ठिकाणी लहान–मुलांकडून माहिती घेतलेली आहे. गणना–पत्रके पेन्सिलनेच भरलेली आहेत. कित्येक ठिकाणी गुणांकनच केलेले नाही. संबंधित कुटुंबाला मिळालेल्या गुणांची कल्पना न देताच, काही ठिकाणी तर गणना–पत्रक न भरताच लोकांच्या सह्या/अंगठे घेतलेले आहेत आणि तर निरक्षर व्यक्तींच्या गणनापत्रकाच्या शेवटी चक्क इंग्रजी भाषेमध्ये सह्या ठोकल्या आहेत. बहुतांश वेळा 'सरकारी कागदपत्रांवर सह्या करायच्या असतात' या मानसिकतेतून लोकांनीही कोणतीही शहानिशा न करताच सह्या केलेल्या आहेत.

- **प्रश्न विचारण्याची पद्धत**

**अपेक्षित :** प्रगणकाने कुटुंबप्रमुखास (उत्तरदात्यास) प्रत्येक प्रश्न समजावून सांगायचा आहे, व प्रत्येक प्रश्नासाठी असलेली चारही पर्याय सांगून त्यातून त्यास निवड करायला सांगायची आहे.

**प्रत्यक्षात :** प्रगणकांना (ते स्वतःच अप्रशिक्षित व अर्धशिक्षित असल्यामुळे) स्वतःलाच प्रश्न पुरेसे न समजल्यामुळे त्यांनी ते लोकांना समजावण्यावर मर्यादा आलेल्या आहेत. अनेक ठिकाणी प्रगणकांनी प्रश्न न विचारता, मनानेच माहिती भरलेली आहे. तर अनेक ठिकाणी प्रगणकांनी प्रश्न विचारलेले आहेत, परंतु प्रश्नाचे पर्याय न सांगताच लोकांकडून उत्तरे घेतलेली आहेत. थोडक्यात कुटुंबप्रमुख अथवा माहिती देणाऱ्याने स्वत: पर्यायांची निवड केलेली नाही.

- **माहितीची विश्वासार्हता**

**अपेक्षित :** २ डिसेंबर २००२ ही माहितीसाठीची संदर्भतारीख म्हणून ठरलेली आहे, म्हणजेच गावकऱ्यांनी २ डिसेंबर २००२ पर्यंत असेलली त्यांच्या कुटुंबांची स्थिती सांगायची आहे. प्रगणकाने मिळालेल्या माहितीची खातरजमा करून घ्यायची आहे, त्यासाठी ग्रामपंचायत व इतर शासकीय यंत्रणांची मदत घ्यायची आहे. उदा. वाहन–मालकीबाबत केवळ दिलेल्या माहितीवर अवलंबून न रहाता परिवहन अधिकाऱ्यांकडून त्याची खात्री करायची आहे.

**प्रत्यक्षात :** ३१ डिसेंबर २००२ पर्यंत पूर्ण होणारे प्रशिक्षण २००३ मे च्या पुढे सुरु झाले. त्यामुळे २००२ डिसेंबर पूर्वीचीच माहिती दिली गेलेली नाही. बहुतेक ठिकाणी सद्यःस्थितीचीच माहिती दिली गेलेली आहे. बहुसंख्य ठिकाणी मिळालेल्या माहितीची कोणत्याही प्रकारे खातरजमा केलेली नाही. गणना–पत्रक भरण्यासाठी लागणारा वेळ – जे गणनापत्रक दिलेल्या सूचनांनुसार भरायला किमान पाऊण तास लागू शकतो ते केवळ १०–१५ मिनिटांत भरले गेले आहे. याशिवाय आधी दिलेल्या मुद्यांवरूनही मिळालेली माहिती 'संपूर्ण विश्वसनीय' असणे अपेक्षित असले, तरी प्रत्यक्षात मात्र ती विश्वासार्ह नसल्याचेच चित्र दिसते.

- **लोकसहभाग**

**अपेक्षित :** गावातील सर्व कुटुंबाचे सर्वेक्षण झाल्यानंतर प्रगणकांनी पर्यवेक्षकांच्या मदतीने सर्व कुटुंबाची त्यांना मिळालेल्या एकूण गुणांनुसार (चढत्या अथवा उतरत्या श्रेणीने) कच्ची यादी तयार करायची आहे. ही यादी ग्रामपंचायत चावडी तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी लावायची आहे. कच्ची यादी जाहीर झाल्यानंतर ग्रामसभेत त्याची चर्चा करायची आहे. गावकऱ्यांनी आपल्या तक्रारी मांडायच्या आहेत, तसेच ग्रामसभेने सर्वेक्षणातील व कच्चा

यादीतील त्रुटी आणि चुका प्रगणकांच्या निदर्शनास आणून द्यायच्या आहेत. जरूर तेथे फेर–सर्वेक्षणाची मागणी करून अशा सर्वेक्षणानंतरच कच्ची यादी तालुका–स्तरावर पाठवण्यासाठी निश्चित करायची आहे.

**प्रत्यक्षात :** ग्रामसभांचे आयोजन झालेलेच नाही. ग्रामसभा झाल्या असल्या तरीही गावातील वंचित घटक त्याला उपस्थित राहिले नाहीत, ग्रामसभेबाबतची माहिती त्यांच्यापर्यंत पोचलेली नाही. ज्या ग्रामसभांमधे वंचित घटक उपस्थित राहिले तेथे गावातील सत्ता–समीकरणांमुळे आपले प्रश्न वा तक्रारी मांडायला ते धजावले तरी नाहीत किंवा असे प्रश्न मांडण्याइतकी माहितीच त्यांना मिळालेली नव्हती. गणसंख्येअभावी ग्रामसभा तहकूब होऊन बऱ्याच ठिकाणी ग्रामसभेची ''औपचारिकता'' पूर्ण करण्यासाठी घरोघरी जाऊन ग्रामसभेच्या ठरावावर सह्या घेण्यात आल्या. परिणामी खरीखुरी गरीब कुटुंबे यादीतून वगळली गेली आणि मुळात धनिक असलेल्या कुटुंबांचा मात्र यादीमधे 'गरीब' म्हणून समावेश झाला.

**प्रयास संस्थेचे उपक्रम**

- फेब्रुवारी २००४ मध्ये या 'दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे ठरवण्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेले निकष' व तसेच 'कुटुंबांच्या सर्वेक्षणाची प्रक्रिया' याचा सखोल अभ्यास. अभ्यासामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील 'परिवर्तन' या संस्थेचा सहभाग
- या अभ्यासातून पुढे आलेल्या निष्कर्षांवर विचारविनिमय करण्यासाठी महाराष्ट्रातील संस्था–संघटनांसोबत चर्चासत्र – चर्चासत्रामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांमधून एकूण ४५ कार्यकर्त्यांचा सहभाग (फेब्रुवारी २००४)
- २००४ साली पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील दोन गावांमध्ये शासकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी समांतर सर्वेक्षण – अभ्यासाचे काम 'रेशनिंग कृती समिती' या संस्था संघटनांच्या नेटवर्क ने केले.
- २००६ साली रत्नागिरी जिल्ह्यातील, संगमेश्वर तालुक्यातील एकूण ३ गावांमध्ये लोकसहभाने शासकीय प्रक्रियेची चिकित्सा.
- शासनाने ठरवलेले निकष कायम ठेऊन परंतू योग्य प्रक्रियेच्या आधारे संमांतर सर्वेक्षण दोन गावांमध्ये (संगमेशवर तालुका) केले. सर्वेक्षणामध्ये गावातील तरुणांचा समावेश.
- संगमेश्वर तालुक्यातील या दोन्ही गावांमध्ये ग्रामसभेचा पुढाकार, ग्रामपंचायतींनी अपुऱ्या तसेच अयोग्य सर्वेक्षणावर आधारित असलेल्या–

## २००२ नंतर प्रक्रियेमध्ये झालेले बदल

वर मांडलेल्या 'पद्धती'नुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार केल्यामुळे अनेक स्वयंसेवी संस्था तसेच काही ठिकाणी ग्रामपंचायती आणि ग्रामसभांमुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीस अंतिम स्वरूप देण्यास अनेक 'अडचणी' निर्माण झाल्या. तसेच पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज (पीयुसीएल) या संस्थेने दाखल केलेल्या रिट विनंतीअर्जावर सर्वेच्च न्यायालयाने दि. ५ मे २००३ रोजी निर्देश दिल्यानंतरही राज्य शासनास या गणनेच्या निष्कर्षांना (कुटुंबांच्या यादीस) अंतिम स्वरूप देता आले नाही. कुटुंबांची यादी अद्ययावत नसल्याने राज्यसरकारे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यास अडचणी मांडू लागल्या. याची दखल घेऊन ग्रामीण विकास मंत्रालयाने दि. १० ऑक्टोबर २००५ रोजी पत्रामध्ये राज्य सरकारांना पाठवलेल्या पत्रामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना २००२ च्या निष्कर्षांच्याच आधारे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अंतिम स्वरूप देण्याचे आदेश दिले होते. परंतु यादीस अंतिम स्वरूप देण्यातील अडचणी लक्षात घेऊन तत्पुर्वी पुढील प्रक्रिया पूर्ण करण्याची विनंती करण्यात आली होती.

**अपेक्षित:** (१)दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना २००२ च्या निष्कर्षांनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीस अंतिम स्वरूप देताना सन् १९९७ च्या ज्या कुटुंबांना नव्या यादीतून वगळले होते अशा कुटुंबांचे तपशील

स्वतंत्रपणे २००२ च्या यादीस जोडण्यात यावेत. या कुटुंबांना २००२ च्या गणना पत्रकाद्वारे जे स्थान (चढत्या/उतरत्या क्रमामध्ये) दिले होते, त्याच क्रमावर ठेवण्यात येईल.

(२) गुणांकन आणि परस्पर स्थान यासहित ही नवी यादी पंचायतीच्या कार्यालयामध्ये एका महिन्यासाठी लावण्यात यावी. यादीस जर ग्रामसभेची मान्यता मिळाली नसल्यास याच कालावधीमध्येच ही यादी ग्रामसभेपुढे ठेवण्यात येईल. ग्रामसभेच्या बैठकीची नोटिस सर्वांना माहिती होईल अशा रीतीने लावण्यात यावी, तसेच बैठकीच्या पूर्वी पुरेशी दवंडी पिटवून तिची मौखिकरित्या घोषणा करण्यात येईल.

(३) या सभेला शाळेचे मुख्याध्यापक, प्रभाग पंच, अंगणवाडी कार्यकर्ते व ग्रामसेवक उपस्थित राहू शकतील. तसेच गणनापत्रकाद्वारे गुणांकन कशा पद्धतीने करण्यात आले आहे हे जाणून घेण्यास मागणी केल्यावर सर्वेक्षण नमुन्याची छायाचित्रप्रत कुणालाही देता येऊ शकेल.

(४) ग्रामपंचायतींच्या मुख्यालयांमध्ये मान्यताप्राप्त याद्या लावल्यानंतर एका महिन्याच्या कालावधीच्या आत ज्या कुटुंबांचा समावेश दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीमध्ये झालेला नसेल अशा कुटुंबांनी तहसिल कार्यालयाकडे त्याच गणनापत्रकामध्ये माहिती भरून हरकती दाखल करता येऊ शकतील. हरकती दाखल झाल्यानंतर अपील प्राधिकाऱ्याने अपील दाखल केल्यापासून दहा दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून निर्णय कळवावा.

**प्रयास संस्थेचे उपक्रम**

- शासकीय प्रक्रियेची चिकित्सा आणि समांतर सर्वेक्षण या दोन्ही उपक्रमांमधून पुढे आलेले निष्कर्ष धक्कादायक - उदा. संगमेश्वर तालुक्यातील कुरधुंडा या गावामध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार गावातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या दुप्पट झाली.
- याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून संगमेश्वर आणि लांजा या दोन तालुक्यांमधील पंचायत समितीच्या वार्षिक आमसभेत जिल्हा प्रशासनाने जाहीर केलेल्या 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या' विविध गावांमधील याद्या फेटाळण्यात आल्या.
- या संपूर्ण प्रक्रियेमध्ये जनसहयोग प्रतिष्ठान आणि कुणबी सेना या दोन स्थानिक संस्था-संघटनांचा सक्रिय सहभाग

**प्रत्यक्षात:** (१) परंतू वरील प्रक्रिया राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये दिल्या गेलेल्या निर्देशांनुसार पूर्ण झालेली नसल्याने हरकतींच्या प्रक्रियेच्या संदर्भात ग्रामीण भागातील कुटुंबांना पुरेशा प्रमाणात माहितीच मिळाली नाही. ग्रामपंचायतींमध्ये याद्या लावणे, त्याबाबत गावातील सर्व कुटुंबांना माहिती देणे, सर्वांना माहिती मिळाली आहे ना? याची खातरजमा करणे अशा बाबी पूर्ण झालेल्या नाहीत.

(२) मुळात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीतून वगळल्या गेलेल्या कुटुंबांच्या हरकती दाखल होणे अपेक्षित होते. परंतु, राज्यातील काही जिल्हे (व तालुके) वगळता अपेक्षित प्रमाणामध्ये हरकती दाखल होऊ शकल्या नाहित.

(३) गावातील सत्ता समीकरणांमुळे तसेच तुलनेने धनिक, राजकीय व्यक्ती आणि त्यांच्याशी संबंध जोपासणाऱ्या कुटुंबांचा प्रशासकीय प्रक्रियेशी चांगला संपर्क असल्याने ज्या हरकती दाखल झाल्या त्या बहुतांश ठिकाणी धनिक कुटुंबांच्याच दाखल झाल्या. यामुळे हरकती दाखल करून घेण्याजोग्या आहेत अथवा नाही याबाबत संभ्रम निर्माण होऊन अनेक हरकती दाखल करूनच घेतल्या गेल्या नाहीत. हरकती दाखल करून घेण्याजोग्या आहेत अथवा नाही याबाबतचे नियमांची माहिती लोकांना हरकती नाकारताना दिली गेलेलीच नाही. अशामुळे ज्या खऱ्याखुऱ्या गरीब कुटुंबांनी हरकती दाखल करण्याचा प्रयत्न केला अशा कुटुंबांनाही यामधून वगळण्यात आले.

(४) सद्यस्थितीमध्येही अनेक ठिकाणी याद्यांना अंतिम स्वरूप देण्यात आलेले नसून, जसजशी अधिकाधिक कुटुंबांना याबाबत माहिती होत आहे अशा कुटुंबांच्या 'तालुक्याच्या गावी' फेऱ्या सुरूच आहेत. हरकती नोंदवण्याची शेवटची तारीख केव्हाच उलटून गेली आहे.

(५) ज्या कुटुंबांच्या हरकती मंजूर करण्यात आल्या अशा कुटुंबानी गणनापत्रकातील चुकीच्या माहितीबाबत ज्या निर्देशकांवर आक्षेप घेतला होता (उदा. कर्जबाजारीपण) अशा माहितीची वैधता पटवण्यासाठी कुटुंबांकडून 'माहितीचे पुरावे' मागण्यात आले आहेत. असे पुरावे (उदा. कर्ज अनौपचारीक स्त्रोतातून घेतलेले असताना अशा कर्जबाजारीपणाबाबत पुरावा संबंधित कुटुंब कसे आणणार? बँक, पतसंस्था औपचारीक संस्थेकडून घेतलेले कर्जाचेच पुरावे दिले जाऊ शकतात.) अशा जाचक अटींमुळे गरीब कुटुंबे हताश झाली आहेत.

## प्रमुख मागण्या

वरील संपूर्ण स्थिती लक्षात घेऊन यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व संस्था आणि संघटनांच्या वतीने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षण आणि हरकतींच्या संपूर्ण प्रक्रियेबाबत पुढील मागण्या मांडत आहोत.

<u>व्यापक सुधारणेच्या दृष्टिने</u>....

(१) गावपातळीवर विशेषतः गावातील वंचित घटकांना ह्या पद्धती व त्या पद्धतीसाठी राबवल्या जाणाऱ्या प्रक्रियेची पूर्ण माहिती देणे, त्या प्रक्रियेत परिणामकारकरीतीने भाग घेण्यासाठी आवश्यक ते क्षमतावर्धन करते, त्या घटकांचा सक्रिय सहभाग संपूर्ण प्रक्रियेत असणे, जमा केलेली माहिती व केलेली प्रक्रिया याबाबत संपूर्ण पार दर्शकता असणे. अशा प्रकारच्या विविध महत्त्वपूर्ण बाबी पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते निकष व पूर्वअटी स्पष्ट केल्या जातील व त्या पाळण्याची अंतिम जबाबदारी जिल्हास्तरीय अधिकाऱ्याकडे असेल.

(२) गावातील प्रक्रिया कशी असावी याबाबतच्या किमान पूर्वअटी, त्या प्रक्रियेमध्ये वापरावयाचे सर्वेक्षणाचे फॉर्म, त्या फॉर्मचा वापर व पुर्नतपासणी करण्यासाठी स्पष्ट सूचना व किमान अटी अशा वाणींचा स्पष्ट उल्लेख असेल. या सूत्रांनुसार गावातील सारी प्रक्रिया चालवून आवश्यक ती माहिती/आकडेवारी सरकारकडे पाठविण्याची जबाबदारी योग्य व सक्षम अशा सरकारी अधिकाऱ्यांवर (उदा. जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांच्या मदतीला जिल्हा समाजकल्याण व सांख्यिकी अधिकारी) असेल.

(३) सध्याच्या पद्धतीमधील अंतिम फॉर्मऐवजी केंद्र सरकारकडून काही मार्गदर्शक सूत्रे पाठवली जातील. प्रत्येक राज्यातील विशिष्ट भौगोलिक विभागातील (उदा. कोकण) परिस्थिती लक्षात घेऊन त्या विभागातील गावांसाठी त्या मार्गदर्शक सूत्रांच्या आधारे राज्यसरकारतर्फे एक आदर्श (मॉडेल) पद्धती तयार केली जावी.

(४) या पद्धतीमध्ये गावागावातील गरीब कुटुंबांपर्यंत या प्रक्रियेची संपूर्ण माहिती व्यवस्थित पोचावी यासाठी सध्याच्या प्रक्रियेत मूलगामी सुधारणा अपेक्षित आहेत. यामध्ये माहितीचे प्रसारण, संवादासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा समावेश करणे आवश्यक आहे. अशा पद्धतींच्या आधारे पुढील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षणासाठी नवीन पद्धतींचा अवलंब करण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य–सरकारने पुढील सुधारणेच्या दृष्टिने शिफारसी पाठवणे अत्यंत आवश्यक आहे.

(५) राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनास एकूण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची देशभरातील टक्केवारी जरी ३४ ते ३६% च्याआत ठेवण्याविषयी स्पष्ट आदेश केंद्र शासनाकडून मिळाले आहेत. असे असले तरीही वेगवेगळी राज्ये व विभागांमधील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती भिन्न असल्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची

जिल्हानिहाय व तालुकानिहाय टक्केवारी वेगवेगळी असू शकते. या वास्तव परिस्थितीची दखल घेऊन जेथे ग्रामसभेद्वारे पुढाकार घेऊन सदर सर्वेक्षणाची प्रक्रिया अपेक्षित मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्ण झाली असेल अशी, ग्रामसभेने तयार केलेली यादी जिल्हा प्रशासनाने मंजूर करावी. याकरिता अशा कुटुंबांच्या हरकती सप्टेंबर २००६ पर्यंत दाखल करून घेण्यात याव्यात. ग्रामसभेच्या पुढाकाराने झालेल्या प्रक्रियेच्या मूल्यमापनासाठी तालुका/जिल्हा प्रशासनातून निरिक्षक पाठवण्यात येऊन शासनास या प्रक्रियेची खातरजमा करून घेता येऊ शकेल.

* * *

# परिशिष्ट १: गणनापत्रकाचे विश्लेषण (निर्देशक, गुणांक व कुटुंब–पत्रक)

कुटुंब पत्रक – गणना – पत्रकाच्या सुरुवातीलाच कुटुंब – पत्राकातील प्रश्न आहेत. या प्रश्नांच्या आधारे प्रत्येक 'कुटुंबाची रूपरेषा' तयार केली जाणे अपेक्षित होते. प्रत्येक प्रश्नाच्या पर्यायानुसार कुटुंबांना मिळणाऱ्या गुणांच्या आधारे त्या कुटुंबांचे स्थान (दारिद्रयरेषेखालील अथवा वरील) ठरवण्यात येणार होते. प्रश्नावली (गणनापत्रका) च्या आधारे एका कुटुंबास जास्तीत जास्त ५२ गुण मिळू शकतात. प्रथम सर्वेक्षण झाल्यानंतर 'छाटणी' गुण जाहीर होऊन छाटणी गुणांच्यापेक्षा कमी गुण मिळालेली कुटुंबे दारिद्रयरेषेखालील कुटुंबे ठरवण्यात येणार होती. या छाटणी गुणांची संख्या विविध जिल्ह्यांसाठी वेगवेगळी असणे अपेक्षित होते. पुढे या तेरा प्रश्नांमधील सदोष प्रश्न, प्रश्नांची संभाव्य उत्तरे म्हणून समाविष्ट असलेले सदोष पर्याय व तसेच गणनापत्रकामध्ये कुटुंबांना विचारण्यात आलेली अनावश्यक माहिती अशा तीन स्तरांवर गणनापत्रकाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) माहितीची अप्रस्तुतता/अनावश्यक माहिती**

कुटुंब – सदस्य, त्यांचे शिक्षण, कुटुंबातील व्यंग / आजार, कुटुंबाचे उत्पन्न, जमिन मालकी, पाण्याची सुविधा इ. तपशीलांचा वापर 'गरिबांचे मोजमाप' करण्यासाठी कसा होणार आहे हे कोठेही स्पष्ट केलेले नाही. गरिब कुटुंबे निवडण्यासाठी या माहितीचा उपयोग होण्याची शक्यताही कमीच आहे.

**२) सदोष प्रश्न**

कुटुंबाचे मासिक उत्पन्न (रुपयांत) (कुटुंब पत्रक – ब) या प्रश्नाची अचूक माहिती घेण्यावर अनेक मर्यादा आहेत. ग्रामीण भागात 'मासिक उत्पन्न' वा 'रुपयात' उत्पन्न मोजले जात नाही. कष्टकरी जनता व सुखवस्तू शेतकरीही आपले उत्पन्न 'रुपयात' सांगतील अशी अपेक्षा करणेच चुकीचे आहे. शेतीचे उत्पन्न मोजण्यासाठी आधी 'किती मण वा खंडी' उत्पन्न मिळते हे विचारावे लागेल. त्यानंतर मण/खंडीचा २ डिसेंबर २००२ पर्यंत असलेला बाजारभाव काढून त्यानुसार उत्पन्न ठरवावे लागेल. प्रगणकांनी हे अर्थातच केलेले नाही. एवढे करूनही 'मासिक उत्पन्नाचा' निश्चित आकडा काढणे शक्य होणार नाही. 'वापरात असलेल्या जमिन धारणेचा प्रकार' (कुटुंब – पत्रक – क) या मुद्यासाठी दिलेले पर्याय सदोष आहेत. 'मालक' (गुणांक – १) या पर्यायातून कुटुंबाचा आर्थिक दर्जाही कळत नाही कारण अल्पभूधारक वा मोठे शेतकरी या पर्यायामुळे एकाच मापाने मोजले जातात.

**३) निर्देशक:** (निर्देशक – शासकीय परिभाषेत साठी 'मानके हा शब्द वापरण्यात आला आहे. त्याऐवजी (Indicaters) या अर्थाने निर्देशक हा शब्द या टिपणात वापरला आहे.)

एकूण १३ निर्देशकांना प्रत्येकी ५ पर्याय दिले असून या पर्यायांना ० ते ४ असे गुण देण्यात आले आहेत. कमी गुण मिळणारी कुटुंबे, 'गरीब' तर जास्त गुण मिळवणारी कुटुंबे धनिक असतील असे या गुणाकनामागील गृहीतक आहे. प्रत्यक्षात मात्र गरीब कुटुंबांना जास्त तर धनिक कुटुंबांना कमी गुण मिळालेले आहेत. सदोष अथवा चुकीचे निर्देशक, सदोष अथवा असंगत पर्याय आणि त्यामुळे होणारे सदोष अथवा विपरित गुणांकन ही या परिस्थितीमागील प्रमुख कारणे आहेत.

## अ) सदोष अथवा चुकीचे निर्देशक

- **कसत असलेल्या जमिनीचे क्षेत्र :** ही शब्दरचना दिशाभूल करणारी आहे. 'कसत' असलेल्या जमिनीवरून जमिनीची मालकी समजत नाही, व त्यानुसार कुटुंबाचा आर्थिक दर्जाही. भूमीहीन असल्यास ० गुण तर .... पेक्षा जास्त जमिन कसत असल्यास सर्वाधिक गुण असे या निर्देशकासाठीचे पर्याय आहेत. प्रगणकाला या निर्देशकामागचे गृहीतक न समजल्यास तो हा प्रश्न जसाच्या तसा विचारेल आणि त्यामुळे जास्तीत जास्त जमिन कसून आपले पोट भरण्यासाठी धडपडणारे मजूर कुटुंब सर्वाधिक गुण मिळवेल. धनिक कुटुंब स्वतः कसत असलेली जमिन कमी व कसायला दिलेली जास्त अशी परिस्थिती असल्यामुळे त्याला सोयीस्करपणे कमी गुण मिळवता येऊ शकतील. परिणामी गरीब कुटुंबाला जास्त गुण तर धनिक कुटुंबाला कमी गुण अशी उलटी/विपरीत गुणांकन केले जाईल.

- पर्याय : जमिनीची मालकी व त्याच्याशी निगडीत असलेला आर्थिक दर्जा समजण्यासाठी 'खात्यावर असलेल्या जमिनीचे क्षेत्र विचारात घ्यावे लागेल. 'हेक्टर'ची परिभाषा लोकांनाच नव्हे तर प्रगणकांनाही अवगत नाही. त्यामुळे अशा परिभाषेऐवजी सात–बाऱ्याच्या उताऱ्यावरून विश्वासार्ह माहिती मिळवता येईल.

- **सरासरी कपडे परिधान उपलब्धता (निर्देशक ३) :** कपड्यांच्या उपलब्धतेवरून गरिबीचे मोजमाप कसे होऊ शकते? हा या निर्देशकावरील प्रमुख आक्षेप आहे. या निर्देशकासाठी दिलेले पर्याय बघता त्यातूनही दिशाभूल करणारी माहितीच मिळू शकते. साधारणतः ग्रामीण भागात 'सधन ब्राह्मणाकडे' कपड्यांचा एक जोड तर 'बहुजन वर्गाकडे' 'हौसे पोटी' अनेक 'जोड' असे चित्र दिसते. शिवाय वेगवेगळ्या समारंतून स्त्रियांना दिले घेतले जाणारे कपडे – त्यांचीच संख्या ५–६ पातळांवर जाऊ शकते, ती विकत घ्यावी लागत नाहीत. त्यामुळे कपड्यांवरून 'आर्थिक स्थिती गरीब नाही' असे अनुमान चुकीचे ठरू शकेल. मानापमानाच्या कल्पनांमुळेही लोक कपड्याबाबतची वस्तुस्थिती न सांगण्याची शक्यता असते. प्रगणकाने खोलात जाऊन – विकत घेतलेले किती, किती घ्यायला परवडतात, घालायला पुरेसे कपडे खरोखर आहेत का, याची चौकशी न केल्यास चुकीच्या गुणांकनामुळे गरीब कुटुंब वगळले जाण्याची शक्यता आहे.
- **स्वच्छता (निर्देशक ५) :** शौचालयाची उपलब्धता हा स्वच्छतेचा निकष ठरवण्यात आलेला आहे. या निर्देशकावरून गरिबी मोजणे खरोखर हास्यास्पद आहे. ग्रामीण भागात श्रीमंत आहे म्हणून शौचालय बांधले किंवा गरीब असल्यामुळे शौचालय बांधणे परवडले नाही असे चित्रच कोठेही दिसत नाही. गरीब वा श्रीमंत सगळ्यांनीच उघड्यावर जाण्याची पद्धत ग्रामीण भागात सर्रासपणे प्रचलित आहे. या निर्देशकासाठी दिलेले पर्याय बघितल्यास विपरित गुणांकनाची ठळक शक्यता दिसते. 'खाजगी घरगुती संडास' या पर्यायास ४ गुण तर 'उघड्यावर शौचास बसणे' याला ० गुण दिलेले आहेत. सधन माणूस या न्यायाने '०' गणु मिळेल, कारण अशा प्रकारच्या सरकारी घर – योजनांमधे मंजुरीनंतर घर बांधण्याच्या आधी संडास बांधावा लागतो आणि एखाद्या गरीब कुटुंबाने त्याचाच वापर खोपटीसारखा केलेला असतो.
- **उपभोग्य टिकाऊ वस्तूंची मालकी (निर्देशक ६) :** उपभोग्य वस्तूंची केवळ मालकी विचारून गरिबी मोजता येणार नाही, कारण त्यातून वापर करण्याची क्षमता समजणार नाही. उदा. घरात विजेच्या वस्तू असल्या तरी त्या नेहेमी वापरल्या जातात की मुंबईला काम करणारे नातेवाईकच त्याचा कधीतरी वापर करतात; वीज – बिल भरणे त्या कुटुंबाला सहज शक्य होते की त्यासाठी घरातली वस्तू वा दागिने गहाण ठेवावे लागतात; (अशी ५–७ तरी कुटुंबे रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये सापडतील) या गोष्टींची खात्री न करताच वस्तू केवळ दिसल्या म्हणून जास्तीचे गुणांकन करण्यामुळे गरीब कुटुंब ओळखता येणार नाही. एखाद्या वस्तूचा वापर कशासाठी होतो आहे याची खात्री केली नाही, उदा. रिक्षासारखे वाहन हे दैनंदिन उपजीविकेचे साधन असू शकते. तर गरजू कुटुंबाला विनाकारण जास्त गुण मिळतील. ज्या कारणांमुळे हा निर्देशक तसेच त्याचे पर्यायही चुकीचे आहेत.
- **घरातील जास्त शिकलेल्या प्रौढ व्यक्तीचे साक्षरता प्रमाण (निर्देशक ७) :** या निर्देशकावरून ही गरीबीचे मोजमाप करता येणार नाही, त्यातून कुटुंबाचा सामाजिक वा आर्थिक दर्जा समजणार नाही. गरीब कुटुंबातही एखादीच व्यक्ती शिकलेली असू शकते. मुलगा – किंवा मुलगी असा फरकही पर्यायांमधे केलेला नाही, त्यामुळे मुलगी शिकलेली पण लग्न झालेली असेल तर काय, हाही प्रश्न अनुत्तरित रहातो.
- गणना – पत्रकातील काही निर्देशक हे असे चुकीचे वा निरूपयोगी असले तरीही काही निर्देशक गरीबीचे मोजमाप करण्यासाठी योग्य असे निकष आहेत, परंतु त्यांच्यासाठी दिलेले पर्याय अप्रस्तुत / सदोष असल्याने त्यातून चुकीची व निरूपयोगी माहिती मिळू शकते. अशा निर्देशकांची चर्चा खाली केलेली आहे.

## ब) सदोष पर्याय

- **घराचा प्रकार (निर्देशक २) :** या निर्देशकासाठी दिलेल्या पर्यायांनुसार 'पक्के घर' असणाऱ्या कुटुंबास ३ गुण दिलेले आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात गरीब असणारे परंतु शासकीय योजनेतून पक्के घर मिळालेले गरीब कुटुंबही '१' गुण मिळवण्याऐवजी जास्तीचे गुण मिळवेल.
- **अन्नसुरक्षा (निर्देशक ५) :** याही निर्देशकासाठी दिलेल्या पर्यायांतून खरे गरीब कुटुंब ओळखता येणार नाही. पर्यायात वापरलेली 'चौरस' आहार ही शब्दयोजना केवळ 'पोटभर' आहार या अर्थाने वापरली जाईल व जातेही प्रत्यक्षात मात्र शिळी भाकरी / भात – कालवण हेही पोटभर जेवण होऊ शकते. कर्ज काढून गोड – धोड वा एरवीही पोटभर जेवणारी कुटुंबेही या पर्यायांमधे वेगळी ओळखलेली नाहीत. त्याचप्रमाणे 'पोटभर खायला मिळत नाही म्हणून आंब्या–करवंदांवर जगणारी' अनेक कुटुंबे 'लाज वाटते' म्हणून ते सांगणार नाहीत. म्हणजेच प्रगणकाने विशेष कौशल्याने चौकशी न केल्यास गरीब कुटुंबे विनाकारण जास्त गुण तरी मिळवतील किंवा यादीतून वगळलीही जातील.

- **कुटुंबाच्या मजूर शक्तीचा दर्जा (निर्देशक ८) :** हा गरिबीचे मोजमाप करण्यासाठी योग्य निर्देशांक असला तरीही त्यासाठी दिलेल्या बंधपात्रित मजूर (०), स्त्रिया व बालमजूर (१), केवळ प्रौढ स्त्रिया व बाल–मजुर नसलेले (२), फक्त प्रौढ पुरुष/स्त्रिया मजुर (३), इतर (४) – या पर्यायांमधून मजुरी न मिळणारी, आई–बापांच्या बरोबर जाणारी, मालक ज्यांना नुसतेच जेवण देतो अशी किंवा जी गुरे राखायला जातात अशी तसेच सर्व प्रकाराचे घरकाम (पाणी भरणे, फाटी आणणे) अशी 'बालमजूर' म्हणून ओळखली न जाणारी (पण प्रत्यक्षात असणारी) अनेक मुले–मुली वगळली जातात. आणि अशा कुटुंबाना विनाकारण ३ गुण मिळू शकतात.
- **उपजीविकेचे साधन (निर्देशक ९) :** या निर्देशकांसाठी दिलेले पर्यायांमुळेही चुकीचे गुणांकन होऊ शकते. उदा. 'उदरनिर्वाहासाठी शेतीचा वापर' करणारे कुटुंब (१) हे शेतमालकाच्या–खोताच्या मजीवर अवलंबून असल्याने 'केवळ मजुरी' करणाऱ्या कुटुंबापेक्षा (०) (निदान ती रोजच्या–रोज मिळते म्हणून) जास्त गरीब असू शकते. 'वेतन' (३) या पर्यायामधे हॉटेलमधे काम करून तुटपुंजा पगार मिळणारा पोऱ्या आणि मुंबईला चाकरमान्या म्हणून नियमित पगार मिळवणारी व्यक्ती एकाच मापाने मोजली जातात, खऱ्या गरजू कुटुंबाला विनाकारण जास्त गुण मिळू शकतात.
- **५–१४ वयोगटातील मुलांचा शैक्षणिक दर्जा (निर्देशक १०) :** या निर्देशकांसाठी दिलेला सर्वाधिक गुणांचा पर्याय 'शाळेत न जाणारी आणि काम करत नसलेली किंवा शाळेत न जाणारे किंवा काम करीत नसलेले' असा आहे. दुसऱ्या प्रकारचे मूल सधन कुटुंबात असण्यापेक्षा गरीब कुटुंबांतच दिसून येते. आपल्या शिक्षणव्यवस्थेने – समाजाने त्याला शिकण्याची गोडी लावलेली नसते आणि रोजगाराची काही संधीही दिलेली नसते. अशी मुले असलेली कुटुंबे या पर्यायामुळे विनाकारण चार गुण मिळवतात.
- **कर्जबाजारीपणाचा प्रकार (निर्देशक ११) :** या निर्देशकासाठी प्रगणक 'आपण कर्जबाजारी आहात का?' असा प्रश्न त्यासाठीचे पर्याय व गृहितक स्पष्ट न करताच विचारतात. त्यामुळे बहुसंख्य गरीब कुटुंबे 'कर्जबाजारी नाही' असे उत्तर देऊन सर्वाधिक गुण मिळवतात. वस्तुस्तः या कुटुंबाची स्थिती – 'बँका किंवा सोसायट्या' कर्ज देत नाहीत, मोठ्या रकमेचे कर्ज घेण्याची ऐपतच नाही, उधार देण्यासाठीही शेजारी–पाजारी दारातही उभे करत नाहीत', अशी असते. शिवाय 'दैनंदिन उपभोगासाठी' घेतलेली रक्कम (गुणांक १) लोकांच्या लेखी कर्ज नसते, तर लगेच फेडून टाकता येणारी उधारी असते, त्यामुळे खरी गरीब कुटुंबे या पर्यायामुळे बँका वा सोसायट्यांकडून कर्ज घेण्याची (गुणांक ३) ऐपत असणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांपेक्षा जास्त गुण मिळवतात, प्रगणकाने कौशल्याने माहिती विचारल्यास या निर्देशकासाठी योग्य ते गुणांकन होऊ शकते.
- **घरातून स्थलांतराचे कारण (निर्देशक १२) :** या निर्देशकासाठी 'अस्थलांतरित' या पर्यायाला '३' तर 'प्रासंगिक' आणि 'हंगामी' स्थलांतर या पर्यायांना अनुक्रमे ० व १ गुण दिलेले आहेत. या दोन्ही प्रकारच्या व्यक्तींना खरे तर रोजगाराची संधी कधीतरी का होईना पण उपलब्ध असते. परंतु अस्थलांतरित व्यक्तीला तेवढीही उपलब्ध नसली तरी विनाकारण जास्त गुण मिळतात व ते कुटुंब 'गरीब' म्हणून ओळखले जाण्याची शक्यताही कमी होते.
- **सहाय्याची पसंती/आवड (निर्देशक १३) :** या निर्देशकासाठी असलेले पर्याय व त्यामागचे शासनाचे गृहीतक स्पष्ट न करताच हा प्रश्न विचारला जातो. त्यामुळे 'माझी कर्ज फेडण्याची ऐपतच नाही म्हणून 'निवारा' (गुणांक ३) मागणारे कुटुंब अथवा 'सरकार देते आहे तर जास्त मागू या' या मानसिकतेतून '१ लाखा पेक्षा जास्त कर्ज' (गुणांक ४) मागणारे कुटुंब अतिशय गरीब असूनही जास्त गुण मिळवून बसते. येथेही प्रगणकाच्या कौशल्यावर गुणांकनाची योग्या–योग्यता अवलंबून आहे.

***